




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



1,22,570

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : ००१ ● पुणे ● बुधवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313






खेड-आळंदी : 13 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात 3





पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धा 6 ते 9 नोव्हेंबर दरम्यान रंगणार 4


## ठळक बातम्या

### अवैध दारू विकणाऱ्यांवर गुन्हा

**पुणे : (आरंभ पर्व)** बाबीर देवाच्या यात्रेमध्ये बेकायदा दारू विकणाऱ्यांवर वालचंदनगर पोलिसांनी छापा टाकून 35 हजार रुपयांची विदेशी दारू जप्त केली. याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. शेखर भानुदास पांढरपिसे (वय 30, रा. रुई) व कृष्णा गोरख धायगुडे (रा. शेटफळ हवेली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

### लाडकी बहीणचे पैसे 2100 रुपये करणार

**पुणे : (आरंभ पर्व)** निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात पक्ष आपले जाहीरनामे प्रसिध्द करत आहेत, अशातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचा आज जाहीरनामा प्रसिध्द होत आहे. यामध्ये लाडक्या बहिणींसाठी मोठा वादा केला आहे. आता लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या रकमेत वाढ करण्यात येईल असं सांगण्यात आलं आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे 1500 वरून 2100 रुपये करणार असल्याचं जाहीरनाम्यामध्ये सांगण्यात आलेलं आहे. जाहीरनामा प्रसिध्द करताना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले, महायुती सरकार काळात जे काम केलं ते लोकांपर्यंत घेऊन चाललो आहोत. आम्ही काही बदल करणाऱ्या योजना मागच्या 4 महिन्यात केल्या आहेत. लाडकी बहीण योजना, आर्थिक दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणासाठी पैसे अशा अनेक योजना जाहीर केल्या. याला प्रचंड प्रतिसाद देखील मिळत आहे. तालुका स्तरीय देखील जाहीरनामा प्रसिद्ध करत आहोत.

# परस्पर पाठिंबा जाहीर करणाऱ्यांना तंबी

## मनसेचा पदाधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा



**पुणे (दै. आरंभ पर्व)** विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवित असतानाही मनसेकडून स्थानिक पातळीवर काही अपक्ष आणि अन्य पक्षांच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा देण्यात आल्याचे पुढे आले आहे. त्याची दखल पक्षाच्या नेत्यांनी घेतली असून, परस्पर असे निर्णय जाहीर करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विधानसभा निवडणूक मनसेकडून स्वबळावर लढविली जाणार आहे. त्यानुसार पुण्यातील चार मतदारसंघांसह राज्यातील अनेक मतदारसंघांत मनसेकडून उमेदवार देण्यात आले आहेत. स्वबळावर निवडणूक लढविण्यात येत असल्याने कोणत्याही अपक्ष, किंवा पक्ष आणि संघटनेच्या उमेदवारास मनसेकडून अधिकृत पाठिंबा देण्यात आलेला नाही. मात्र, काही ठिकाणी स्थानिक पातळीवर पक्षाकडून पाठिंबा देण्यात आल्याची बाब पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आढळून आली आहे.

अपक्ष किंवा पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत कोणताही निर्णय पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर झालेला नाही. त्याबाबतचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना आहेत. त्यामुळे राज ठाकरे यांच्या निर्णयाच्या पूर्वी मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून पाठिंब्यासंदर्भात कोणताही निर्णय जाहीर करण्यात आला असेल, तर तो पक्षाचा निर्णय नाही. त्यामुळे असे परस्पर निर्णय जाहीर करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मनसे नेते अनिल शिदोरे आणि राजेंद्र उर्फ बाबू वागसकर यांनी जाहीर केले आहे.

## पुण्यात होणार ‘राज गर्जना‘

**पुणे (दै. आरंभ पर्व)** विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसेचे) अध्यक्ष राज ठाकरे पुणे दौऱ्यावर येणार आहेत. या पुणे दौऱ्यामध्ये ठाकरे यांच्या पुण्यात सभा होणार आहेत. 9 नोव्हेंबरला कसबा आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांसाठी, तर 13 नोव्हेंबरला खडकवासला आणि हडपसर विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या जाणार आहेत. मात्र या सभेची ठिकाणे अद्याप निश्चित झालेली नाहीत. जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदारसंघांपैकी पुणे शहरातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये



मनसेने चार उमेदवार दिले आहेत. त्यांच्या प्रचारासाठी राज ठाकरे पुण्यात येणार आहेत. दोन टप्प्यात ठाकरे यांच्या सभा होणार असून 9 नोव्हेंबरला कसबा आणि कोथरूड, तर 13 नोव्हेंबरला खडकवासला, हडपसर विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांच्या प्रचारासाठी ते सभा घेणार आहेत. मात्र, या सभेची ठिकाणे अद्यापही निश्चित झाली नसल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.

लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केलेली मनसे विधानसभा निवडणूक लढणार की, महायुतीला पाठिंबा देणार याबाबत मोठी उत्सुकता होती. मात्र, राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणूक स्वतंत्र लढणार असल्याचे जाहीर करत पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी चार मतदारसंघांत उमेदवार दिले आहेत. शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांना हडपसरमधून, मनसेचे दिवंगत आमदार रमेश वांजळे यांचे पुत्र मयुरेश वांजळे यांना खडकवासलात, माजी नगरसेवक किशोर शिंदे यांना कोथरूडमधून, तर कसबा विधानसभा मतदारसंघातून गणेश भोकरे यांना उमेदवारी दिली आहे.

## शिरूर-हवेलीत 11 जण रिंगणात!

### *नऊ नोंदणीकृत पक्षाचे तर दोन अपक्षासह तीन अशोक पवार रिंगणात*

**वाघोली (दै. आरंभ पर्व)** शिरूर-हवेली विधानसभा मतदार संघात भाजपचे बंडखोर प्रदीप कंद, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे शांताराम कटके या दोन प्रमुख बंडखोरांनी माघार घेतल्याने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अशोक पवार व राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे माऊली कटके यांच्यात दुरंगी लढत होणार आहे. इतर अजून नऊ उमेदवार रिंगणात आहेत.

शिरूर - हवेली विधानसभेत एकूण 25 उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी 14 जणांनी माघार घेतली. 11 उमेदवार रिंगणात राहिले. यामध्ये नोंदणीकृत पक्षाचे नऊ तर दोन अपक्षांचा समावेश आहे.




बहुजन समाज पार्टीचे विशाल सोनावणे, संभाजी ब्रिगेडचे चंद्रशेखर घाडगे, सैनिक समाज पार्टीचे तुकाराम डफल, बहुजन मुक्ती पार्टीचे नाठा पाचर्णे, समता पार्टीचे भाऊसाहेब जाधव, महाराष्ट्र स्वराज्य पार्टीचे विनोद चांदगुडे, व राष्ट्रीय समाज पक्षाचे शिवाजी कुऱ्हाडे हे उमेदवार रिंगणात आहेत. मंगळवारी दोन्ही प्रमुख उमेदवारांनी प्रचाराचा नारळ फोडून प्रचाराला सुरुवात केली.

शिरूर - हवेली विधानसभा मतदार संघात एकूण 4,66,042 मतदार आहेत. यामध्ये वाघोलीतील मतदारांची संख्या सुमारे 66000 आहे. दोन्ही राष्ट्रवादीत ही लढाई होत आहे. उमेदवारांची संख्या 11 आल्याने एकच बॅलेट मशीन असणार आहे.

### तीन अशोक पवार रिंगणात

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार अशोक रावसाहेब पवार, अपक्ष अशोक गणपत पवार व अशोक रामचंद्र पवार या तीन अशोक पवार उमेदवारांचा समावेश शिरूर हवेली मतदार संघात आहे.






# शरद पवार यांचे बारामतीकडे विशेष लक्ष

## आज बारामतीत सहा सभा

**पुणे/ बारामती (दै. आरंभ पर्व)** संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या आणि पवार कुटुंबीयांची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या बारामती मतदारसंघाकडे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी विशेष लक्ष दिले आहे. बारामतीचा गड राखण्यासाठी शरद पवार यांच्या आज, मंगळवारी (5 नोव्हेंबर) बारामती शहर आणि ग्रामीण भागात एकूण सहा सभा होणार आहेत.

लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभेची निवडणूकही शरद पवार आणि अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची ठरली आहे. बारामती शहराचे गेली पस्तीस वर्षे प्रतिनिधित्व करणारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापुढे त्यांचे सख्खे पुतणे, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांचे आव्हान असणार आहे. या दोघांनी गेल्या सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पवार कुटुंबीयांतील भावनिक राजकारणाला सुरुवात झाली होती. ‘घर फोडल्याचा’ आरोप अजित पवार



यांनी केल्यानंतर या आरोपाला शरद पवार यांनीही स्पष्ट उत्तर दिले होते. ‘घर फोडण्याचे पाप कधी केले नाही, आणि तशी शिकवणही मला आई-वडील आणि भावांनी दिली नाही,’ असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला होता. या दरम्यान, दिवाळीनिमित्ताने शरद पवार आणि अजित पवार या दोघांनीही स्वतंत्रपणे नागरिकांच्या भेटी घेतल्या होत्या.

बारामतीची निवडणूकही प्रतिष्ठेची ठरली असल्याने या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनीही बारामतीकडे विशेष लक्ष दिले असून नातवासाठी ते मैदानात उतरले आहेत. त्याअनुषंगाने शरद पवार यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. या सभांना ‘स्वाभिमानी सभा’ असे नाव देण्यात आले आहे. यातील चार सभा ग्रामीण भागात तर दोन सभा बारामती शहरात होणार आहेत. बारामती तालुक्यातील शिर्सुफळ, सुपा येथील बसस्थानकाजवळ, श्री क्षेत्र मोरगाव येथील हॉटेल शिवतारा येथे, सोमेश्वरनगर करंजे येथे कारखाना रस्ता परिसरात शरद पवार यांच्या जाहीर सभा होणार आहेत. त्यामुळे शरद पवार या सभांच्या माध्यमातून काय बोलणार, याकडे पक्षाच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

### बड्या नेत्याच्या कुटुंबात उभी फूट

हर्षवर्धन पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला होता. त्यानंतर लगेचच त्यांना पक्षाकडून इंदापूर विधानसभेची उमेदवारी देखील जाहीर झाली. मात्र हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यामुळे इंदापूर राष्ट्रवादीमधील अनेक पदाधिकारी नाराज आहेत. प्रवीण माने यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. तर अप्पासाहेब जगदाळे यांनी महायुतीचे उमेदवार दत्तात्रय भरणे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. दरम्यान या धक्क्यांनंतर आता हर्षवर्धन पाटील यांना आणखी एक धक्का बसला आहे. मयूर पाटील यांनी हर्षवर्धन पाटील यांची साथ सोडत प्रवीण माने यांना पांठिबा जाहीर केला आहे. मयूर पाटील हे हर्षवर्धन पाटील यांचे चूलत बंधू आहेत. हा हर्षवर्धन पाटील यांच्यासोबतच राष्ट्रवादी शरद पवार गटासाठी देखील मोठा धक्का मानला जात आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीनंतर पाटील कुटुंबात फूट पडली आहे. त्यांचे बंधू मयूर पाटील यांनी प्रवीण माने यांना पाठिंबा दिला आहे. मयूर पाटील हे इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती असून, त्यांचं इंदापुरात मोठं राजकीय वर्चस्व असल्याचं मानलं जातं. त्यांनी प्रवीण माने यांना पाठिंबा दिला आहे, मयूर पाटील यांच्यासोबतच कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक सचिन देवकर यांनी देखील प्रवीण मानेंच्या परिवर्तन विकास आघाडीला पाठिंबा दिला आहे. यावेळी बोलताना मयुर पाटील यांनी हर्षवर्धन पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.




# कौल कोणाला...



*राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाआघाडी विरुद्ध महायुती या अटीतटीच्या लढाईत सहा प्रमुख नेत्यांची खऱ्या अर्थाने परीक्षा आहे. सन 2019 पर्यंत भाजपा-शिवसेना युती विरुद्ध काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस महाआघाडी अशी लढत होत होती. गेल्या पाच वर्षांत राज्यात झालेली सत्तांतरे आणि दोन प्रमुख प्रादेशिक पक्षांत झालेली बंडखोरी यातून राजकीय समीकरणे बदलली आहेत. महायुतीला एक नेता नाही आणि महाआघाडीला सुद्धा सर्वमान्य नेता नाही. उद्धव ठाकरे हे माजी मुख्यमंत्री असले तरी ते महाआघाडीचे नंबर 1 चे नेते म्हणून ओळखले जात नाहीत आणि एकनाथ शिंदे हे महायुतीचे मुख्यमंत्री असले तरी निवडणुकीनंतर तेच मुख्यमंत्री असतील असे भाजपा किंवा अजित पवार गट सांगायला तयार नाही. म्हणूनच शरद पवार, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, नाना पटोले या सर्वच नेत्यांची या निवडणुकीत मोठी परीक्षा आहे. मुस्लीम व्होट बँक ज्यांचा मोठा आधार बनली आहे, त्या उबाठा सेनेचे भवितव्य यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर ठरणार आहे.*

यंदा 2024 ची राज्य विधानसभा निवडणूक खरोखरच अभूतपूर्व आहे. रस्त्यांवर पिंजऱ्यात बसलेल्या पोपटालाही बाहेर येऊन कोणता पक्ष सरकार बनवणार याचे कार्ड शोधणे अवघड आहे. कुडमुडे ज्योतिषी आणि मतदारांचा निवडणूकपूर्व व मतदानोत्तर कौल घेणाऱ्या वृत्तवाहिन्यांनीही यंदाच्या निवडणुकीत ताकही फुंकून प्यावे लागणार आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकारणाने सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री आणि सर्व प्रमुख पक्षांना सत्ता उपभोगण्याची संधी या राज्यात मिळाली. ठाकरे यांच्या पक्षाचे 40 आणि शरद पवारांच्या पक्षाचे 40 अशा 80 आमदारांनी पक्ष नेतृत्वाला आव्हान दिले व पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह काबीज केले, असे महाराष्ट्रात प्रथमच घडले. मराठीच्या अस्मितेचा अभिमान बाळगणारे उबाठा सेना, शिवसेना (शिंदे), मनसे हे तीनही पक्ष मैदानात आहेत. ठाकरेंच्या पक्षातून बाहेर पडलेले नेते उबाठा सेनेवर तुटून पडत आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन तुकडे झाल्यापासून काका विरुद्ध पुतण्या असा जंगी सामना रोज बघायला मिळत आहे. यंदाच्या निवडणुकीला सर्वपक्षीय कुटुंबशाहीचा विळखा पडला असला तरी मतदारांनीच ही व्यवस्था स्वीकारली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाप्रमाणेच विधानसभेला मतदार कौल देतील काय, हा मोठा कळीचा मुद्दा आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात महायुतीची सत्ता यायलाच हवी, यासाठी देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांनी चंग बांधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचेही राज्यात मोठे दौरे होणार आहेत. देशाची आर्थिक राजधानी मुंबई ज्या राज्यात आहे, त्या राज्याची सत्ता वाट्टेल ते करून आपल्याच हाती राहिली पाहिजे यासाठी भाजपाने सर्वस्व पणाला लावले आहे. राज्याचा मुख्यमंत्री मित्रपक्षाचा असला तरी त्याचा रिमोट कंट्रोल हा भाजपाच्या हाती असतो, हे जनतेलाही पूर्ण ठाऊक आहे. महाआघाडी व महायुतीतील मित्रपक्षांमध्ये स्पर्धा आहेच. आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आले तरच आपल्याला महत्त्व मिळते, हे त्यांच्या नेत्यांना



चांगले ठाऊक आहेत. आमदारांच्या संख्याबळावरच नेत्यांची पत आणि प्रतिष्ठा मोजली जाणार आहे. आमदारांचे संख्याबळ असेल, तरच सौदेबाजी करता येते. म्हणूनच सहा पक्षांच्या सहा नेत्यांची विधानसभा निवडणुकीत कठोर परीक्षा आहे. एकनाथ शिंदे एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरोधात बंड करण्याची हिम्मत दाखवली. शिवसेनेतून एकाच वेळी 40 आमदार, 13 खासदार बाहेर पडल्यावर महाराष्ट्रात राजकीय भूकंप झाला. ठाकरेंना मुख्यमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागलेच आणि महाआघाडीचे सरकारही कोसळले. त्याचे बक्षीस म्हणून भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले. शिंदे हे भाजपाचे बाहुले मुख्यमंत्री असतील. महाराष्ट्राच्या सर्वोच्च पदावर बसल्यावर 'भाजपा बोले व शिंदे डोले' असे वागतील असे अनेकांना वाटत होते. पण शिंदे यांनी आपल्या कामाने स्वतःची तडफदार मुख्यमंत्री म्हणून प्रतिमा निर्माण केली. आपल्या कामगिरीने त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास संपादन केला. अहोरात्र काम करणारा कार्यक्षम मुख्यमंत्री अशी त्यांची ओळख झाली. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने 15 जागा लढवल्या व 7 जिंकल्या. उबाठा सेनेपेक्षा शिंदेंच्या शिवसेनेचा स्ट्राइक रेट सरस ठरला. शिंदे यांची शिवसेना विधानसभेच्या 80 जागा लढवत आहे. ज्यांनी बंडाला साथ दिली त्या सर्वांना शिंदे यांना निवडून आणायचे आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित चांगले यश मिळाले, तर शिंदे राज्याच्या सिंहासनावर पुन्हा बसू शकतील. भाजपा श्रेष्ठींनी त्यांच्यातील नेतृत्व गुणवत्ता, कामाची तडफ हेरली आहे. उद्धव व आदित्य यांच्या नावामागे ठाकरे आडनाव आहे. शिंदे हे स्वतःच्या कर्तृत्वाने नेते झाले आहेत. सतत सक्रिय राहून व संघर्ष करून त्यांना झगडावे लागले आहे. निकालानंतर ते स्वतः किंग होतील किंवा किंग मेकर म्हणून त्यांना भूमिका बजवावी लागेल. शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या गटाला दिले आहे. विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यावर शिक्कामोर्तब करणे आवश्यक आहे. यंदाची निवडणूक ही ठाकरे विरुद्ध शिंदे आणि शिवसेना विरुद्ध उबाठा सेना अशी आहे. शिंदे यांना शिवसेना आपलीच आहे हे सिद्ध करून दाखवावे लागेल. भाजपाकडे अजित पवार व राज ठाकरे (महायुतीच्या बाहेरील) हे आणखी दोन मित्र आहेत, याचे भान ठेऊन शिंदे यांना राजकारण खेळावे लागणार आहे.

**देवेंद्र फडणवीस**

पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना 2019च्या निवडणुकीनंतरच्या पाच वर्षांत मुख्यमंत्री (80) तास, विरोधी पक्षनेता व उपमुख्यमंत्री अशा तीनही भूमिका पार पाडव्या लागल्या. आजही देवेंद्र हेच महाराष्ट्राचा भाजपाचा चेहरा आहेत. तेच भाजपाचे राज्यात नंबर 1 चे नेते आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाने महाराष्ट्रात 28 जागा लढवल्या पण केवळ 9 जागांवर विजय मिळाला. केंद्रात व राज्यात भाजपा सत्तेवर असूनही राज्यात भाजपाला नामुष्की पत्करावी लागली. लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या खराब कामगिरीनंतर स्वतः देवेंद्र यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शविली. आपण पक्षासाठी काम करू असे त्यांनी म्हटले होते.पण श्रेष्ठींनी उपमुख्यमंत्री पदावर राहा असे सांगून पक्षाची महाराष्ट्राची सूत्रे त्यांच्याकडे सोपवली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही, असे स्वतः फडणवीस यांनी म्हटले आहे. मराठा आणि ओबीसी अशी भाजपाला मोठी कसरत करावी लागत आहे. फडणवीस हे नागपूरचे आहेत. पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यातील ते सेतू आहेत. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रचारात यावेळी संघ परिवार सक्रिय आहे. भाजपा जवळपास दीडशे जागा लढवत असून शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणणे हे पक्षाचे लक्ष्य आहे. भाजपाचे सर्वाधिक आमदार असूनही गेली पाच वर्षे मुख्यमंत्रीपद फडणवीसांना हुलकावणी देत आहे. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात वर्चस्वाचे द्वंद्व चालू आहेच. यंदाच्या निवडणुकीत काही चमत्कार घडू शकेल का?

**शरद पवार**

गेली सहा दशके महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडीवर असलेल्या 84 वर्षे वयाच्या शरद पवार यांच्या दृष्टीने यंदाची निवडणूक मोठी आव्हानात्मक आहे. पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदावर बसविण्यात आणि भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यात पवारांची कौशल्यपूर्ण रणनिती व मुत्सद्देगिरी कारणीभूत होती. महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्यात पवार यांचाच पुढाकार होता. भाजपाकडून दुखावलेल्या उद्धव ठाकरेंना महाआघाडीच्या तंबूत खेचण्यामागे पवार यांचाच आराखडा होता. आता महाविकास आघाडीचे सरकार हटविण्यासाठी पवार जिद्दीने मैदानात उतरले आहेत. आपल्या स्वतःच्या पक्षात झालेले बंड मोडून काढणे पवारांना जमले नाही, पण मतदारांसमोर जाऊन आपण स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हाच खरा पक्ष आहे हे सिद्ध करण्याचे आणखी मोठे आवाहन पवारांसमोर आहे. लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ काकांनी जिंकून दाखवला. तिथे सुनेत्रा पवारांचा पराभव करून सुप्रिया सुळे विजयी झाल्या. आता विधानसभा निवडणुकीत घरातलेच उमेदवार पुन्हा तोच खेळ खेळत आहेत. लोकसभा निवडणुकीत पवारांच्या पक्षाने 10 जागा लढवल्या व 8 जिंकल्या. विधानसभेसाठी त्यांचा पक्ष 87 जागा लढवत आहे. पक्षाच्या प्रचारासाठी ते दिवस-रात्र वणवण करीत आहेत. उपमुख्यमंत्री असलेल्या पुतण्याशी बारामतीत आपल्याच होम ग्राऊंडवर थेट लढा देण्याची वेळ काकांवर आली आहे.

# क्रॉम्प्टनकडून किनायजेला प्रो मिक्सर ग्राइंडर लाँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

क्रॉम्प्टन ग्रीव्ह्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेड या तंत्रज्ञान प्रगती व ग्राहक समाधानाप्रती दीर्घकालीन कटिबद्धतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या कंपनीने त्यांच्या किचन अप्लायन्सेस पोर्टफोलिओमध्ये नवीन अप्लायन्स - नायजेला प्रो 500 वॅट मिक्सर ग्राइंडर लाँच केला आहे. कार्यक्षमता व आधुनिक आकर्षकतेला एकत्र करत कूकिंग अनुभवाला अधिक उत्साहित करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला क्रॉम्प्टन नायजेला प्रो कोणत्याही घरामध्ये आवश्यक असा मिक्सर ग्राइंडर आहे. कार्यक्षमता व सोयीसुविधेसाठी डिझाइन करण्यात आलेला हा मिक्सर ग्राइंडर सर्व पाककला गरजांची पूर्तता करतो. शक्तिशाली 500 वूट पॉवरट्रॉन मोटरसह हा मिक्सर ग्राइंडर त्वरित ग्राइंडिंग व ब्लेण्डिंग देतो, ज्यामुळे दररोज कूकिंगमध्ये वेळेची बचत होते.

सर्वोत्तम कूकिंग क्षमतेसह क्रॉम्प्टन नायजेला प्रो मिक्सर ग्राइंडर कूकिंगची कामे सोपी करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. हा बहुउद्देशीय ग्राइंडर कार्यक्षमता व सोयीसुविधा देतो, जेथे घटकांचे मिश्रण करणे, स्टोअर करणे व वाहून नेण्यासाठी अनेक जार्स आहेत, ज्यामुळे बहुमूल्य वेळेची बचत होते. नायजेला प्रो त्याच्या सातत्यपूर्ण 30-मिनिटे ग्राइंडिंग क्षमतेमुळे कूकिंगसाठी तुमचा विश्वासार्ह सोबती आहे, ज्यामधून सर्वात आव्हानात्मक पाककलांमध्ये देखील सुलभ कार्यसंचालनाची खात्री मिळते. सकाळच्या वेळी त्वरित स्मूदी तयार करायचे असो, बेबी फूड तयार करायचे असो किंवा स्वादिष्ट चटणी तयार करायची असो नायजेला प्रो मिक्सर ग्राइंडर फक्त किचन अप्लायन्स नसून जीवनशैली उत्साहवर्धक करतो. अधिक कार्यक्षमता व सोयीसुविधेसाठी डिझाइन करण्यात आलेल्या या मिक्सर ग्राइंडरमध्ये अद्वितीय ग्राइंड, ब्लेण्ड, स्टोअर व कॅरी जार्स आहेत, जे सर्व पाककला गरजांची पूर्तता करतात. तसेच, शक्तिशाली 500 वॅट पॉवरट्रॉन मोटरसह हा मिक्सर ग्राइंडर सुलभ ग्राइंडिंग व ब्लेण्डिंगची खात्री देतो, ज्यामुळे कडक घटकांचे सहज ग्राइंडिंग होण्यासह वेळेची बचत होते.

नायजेला प्रो मिक्सर ग्राइंडर कुटुंबातील पाककला अनुभव अधिक उत्साहित करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे, जो बर्फ ब्लेण्डिंग करण्यापासून नाजूक घटकांचे सर्वोत्तम ग्राइंडिंग करण्यापर्यंत आव्हानात्मक कामांची हाताळणी करतो.

ग्राइंड, ब्लेण्ड, स्टोअर आणि कॅरी जार्स: नायजेला प्रोमध्ये विशेषरित्या डिझाइन केलेल्या इन्व्हर्टेड पीसी जार्ससह कव्हर लिड्स आणि सिपर कॅप्स आहेत, ज्यामुळे पिसलेले घटक चालता-फिरता सहजपणे स्टोअर करता येतात.

विनासायास ग्राइंडिंग: सतत 30 मिनिटे ग्राइंडिंगचा अनुभव घ्या, जे वारंवार येणाऱ्या व्यत्ययाचा त्रास दूर करत अधिक प्रमाणात ग्राइंडिंगसाठी परिपूर्ण आहे.

एर्गोनॉमिकली डिझाइन: मोठे नॉब ऑपरेट करण्यास सोपे आहे, ज्यामधून प्रत्येकाला युजर-अनुकूल अनुभवाची खात्री मिळते.

सुधारित एअरफ्लो आणि आकर्षकता: नाविन्यपूर्ण हनीकॉम्ब वेण्ट्स कार्यक्षम कार्यसंचालनासाठी एअरफ्लो सुधारण्यासोबत किचन सजावटीमध्ये आधुनिक आकर्षकतेची भर देखील करतात.

सहज साफसफाई व वापर: पारदर्शक पीसी जार्समुळे सतत ब्लेण्डिंगवर देखरेख ठेवता येते, ज्यामुळे इच्छित टेक्स्चर प्राप्त करणे अधिक सोपे झाले आहे.



> गंजरोधक व लीकेज-फ्री स्टेनलेस स्टील जार्स असलेला नायजेला प्रो संपूर्ण भारतातील घरांमधील ब्लेण्डिंग अनुभवाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यास सज्ज आहे. या उत्पादनाची किंमत 3500 रूपये आहे आणि सर्व क्रॉम्प्टन अधिकृत रिटेल आऊटलेट्स व आघाडीच्या ईकॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध आहे. हे नाविन्यपूर्ण उत्पादन सकाळच्या वेळी सहजपणे ब्रेकफास्ट तयार करण्याची सुविधा देण्यास, तसेच आहार आरोग्यदायी व जीवन सोपे करण्यास सज्ज आहे.

नायजेला प्रो मिक्सर ग्राइंडरसह क्रॉम्प्टन दैनंदिन कूकिंग अनुभव अधिक उत्साहित करण्याप्रती कटिबद्ध आहे, ज्यामध्ये क्षमता, सोयीसुविधा व स्टाइलचे परिपूर्ण संतुलन आहे.

कंपनीच्या नवीन लाँच करण्यात आलेल्या उत्पादनाबाबत मत व्यक्त करत क्रॉम्प्टन ग्रीव्ह्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लि. मधील स्मॉल डॉमेस्टिक अप्लायन्सेसचे पीएल प्रमुख केतन चौधरी म्हणाले, नायजेला प्रो मिक्सर ग्राइंडरच्या लाँचसह आम्हाला ग्राहकांसाठी किचनमधील सोयीसुविधेमध्ये अधिक वाढ करण्याचा आनंद होत आहे. हे नाविन्यपूर्ण उत्पादन कूकिंग अनुभव उत्साहित करते, तसेच वापरकर्त्यांना पौष्टिक स्मूदीपासून स्वादिष्ट चटणीपर्यंत विविध पाककला कार्यक्षमपणे तयार करण्यास मदत करते. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमधील सर्वसमावेशक गरजांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला नायजेला प्रो ग्राहकांना आरोग्यदायी जीवन जगण्यास सक्षम करतो. ग्राइंड, ब्लेण्ड, स्टोअर व कॅरी जार्ससह या मिक्सर ग्राइंडरची अद्वितीय वैशिष्ट्ये जेवण तयार करण्याची प्रक्रिया कार्यक्षम व आनंददायी करतात.

शक्तिशाली 500 वॅट पॉवरट्रॉन मोटर आणि प्रगत मोटर वेण्ट-एक्स तंत्रज्ञान असलेला नायजेला प्रो सानुकूल कार्यक्षमता आणि टिकाऊपणाची खात्री देतो. तुम्ही व्यस्त व्यावसायिक असा किंवा पाककलाप्रेमी असा, हा मिक्सर ग्राइंडर किचनमध्ये असायलाच हवे असे उत्पादन आहे, जो सर्व कूकिंग गरजांची पूर्तता करतो. यामधून जीवन सुलभ करणारे दर्जात्मक अप्लायन्सेस देण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते.

## थोडक्यात



### गडकिल्ले स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा संपन्न

**उरूळी कांचन (आरंभ पर्व) :** महाराष्ट्राला गड-किल्ल्यांचे वैभव लाभले आहे. नव्यापिढीला गड-किल्ल्यांची तर विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या थोर पराक्रमाची माहिती व्हावी या निरपेक्ष भावनेतूनच पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई गड-किल्ले' स्पर्धा सलग 10 वर्षे राबवित असल्याने हे सातत्य पुढे चालू ठेवावे असे आवाहन इतिहासाचार्य अंनत दारवडकर यांनी व्यक्त केले. या वर्षी 10 व्या 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई गड-किल्ले' स्पर्धेच्या निमित्ताने, स्पर्धेचे आयोजक संघर्ष प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, उरूळी कांचन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. तसेच इतिहास अभ्यासक महेश पवार यांच्या संकल्पनेतून स्वराज्याचे आरमार प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. स्पर्धेत सहभाग झालेल्या सर्व 65 किल्लेदारांना सौरभ मिलिंद जगताप यांच्या तर्फे सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत राजमुद्रा प्रतिष्ठान ओम लोखंडे याना प्रथम क्रमांक, केदार जाधव, छत्रपती ग्रुप आणि साहिल तानाजी खलसे याना अनुक्रमे द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांक मिळाला. तसेच शिवप्रतिष्ठान, आर्यन खलसे, प्रतीक भोंगळे आणि अमृता कोळी याना उत्तेजनार्थ क्रमांक मिळून विजेत्यांना निर्माण डेव्हलपर्स च्या वतीने गौरविण्यात आले.

# हिटलरच्या भूमिकेत प्रशांत दामले तर चर्चिलच्या भूमिकेत आनंद इंगळे

## मल्टी-स्टारर 'मु.पो.बोंबिलवाडी' चे पोस्टर प्रदर्शित : 'मु.पो.बोंबिलवाडी' १ जानेवारी २०२५ रोजी होणार प्रदर्शित

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांनी घोषणा केलेल्या 'मु.पो. बोंबिलवाडी'बद्दलची उत्कंठा शिगेला पोहोचली असताना या चित्रपटात हिटलर व चर्चिलच्या भूमिका कोण बजावणार यांबद्दल रसिकांमध्ये कुतूहल होते. हिटलरच्या भूमिकेत 'क्युट' प्रशांत दामले झळकणार हे स्पष्ट झाल्यानंतर आत्ता चर्चिलच्या भूमिकेत




आनंद इंगळे दिसणार असल्याचे जाहीर झाले आहे. निर्मात्यांनी आज 'मु.पो.बोंबिलवाडी' चे पोस्टर प्रदर्शित केले.

1 जानेवारी 2025 रोजी प्रदर्शित होवू घातलेल्या या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चित्रपट मल्टी-स्टारर आहे. प्रशांत दामले, आनंद इंगळे, वैभव मांगले, गीतांजली कुलकर्णी, सुनील अभ्यंकर, मनमित पेम, रितिका श्रोत्री, प्रणव रावराणे, अद्वैत दादरकर, गणेश मयेकर, दीप्ती लेले, राजेश मापुस्कर हे चित्रपटसृष्टीतील आघाडीचे कलाकार चित्रपटात झळकणार आहेत. परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी यांच्या गतवर्षी चित्रपटगृहांमध्ये धमाल उडवून देणाऱ्या 'वाळवी'ला अलीकडे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. त्यांच्या 'नाच गं घुमा'ने यंदा प्रचंड प्रतिसाद मिळविला. हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, ची. व ची. सौ. का., आत्मपॅम्प्लेट यांसारख्या त्याधीच्या दर्जेदार व गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती. राष्ट्रीय पुरस्काराचा आनंद द्विगुणीत करत परेश आणि मधुगंधा यांनी त्यांच्या 'मु.पो.बोंबिलवाडी- 1942एका बॉम्बची बोंब'ची घोषणा दोन महिन्यांपूर्वी केली.

चित्रपटाच्या घोषणेनंतर प्रदर्शित केलेल्या मोशन पोस्टरवरून ही स्वातंत्र्यपूर्व काळातील एक ब्रिटीशकालीन कथा आहे आणि एका बॉम्बस्फोटाभोवती ती फिरते, अंदाज रसिकांना आला होता. आज प्रदर्शित करण्यात आलेल्या पोस्टरच्या माध्यमातून नवनवीन पात्रे रसिकांसामोरे येतात. ती सकारात असलेले कलाकार या पोस्टरमध्ये दिसतात आणि एवढी मोठी स्टारकास्ट असल्याने चित्रपट अत्यंत दर्जेदार असेल, याही खुणगाठ प्रेक्षक आपोआप बांधतो.

या चित्रपटाची निर्मिती मधुगंधा कुलकर्णी, विवेक फिल्म्स आणि मयसभा करमणूक मंडळी यांची असून लेखन-दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे. काही वर्षांपूर्वी आलेल्या आणि प्रचंड गाजलेल्या याच नावाच्या नाटकाचे हे चित्रपटीय स्वरूप आहे. रसिकांच्या मागणीवरून ही चित्रपट निर्मिती संहितेत काही बदल करून केली गेली आहे.

या चित्रपटाबद्दल बोलताना परेश मोकाशी म्हणाले, "मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी' हे नाटक लोकांना इतके आवडले की तो माझ्यासाठी एक सुखद धक्का होता! 'बोंबिलवाडी'सारख्या छोट्या गावात इंटरनॅशनल घटना घडतात आणि त्यावर दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा निकाल लागतो ही फार्सिकल गोष्ट आजही तितकाच व्यायाम देईल फुप्फुसांना!"

हा चित्रपट प्रेक्षकांनी का पहावा, असा प्रश्न विचारला असता मोकाशी यांनी मिश्कील उत्तर दिले आहे. "आजकाल व्यायाम नीट होत नाही, त्यामुळे फुप्फुसानाही व्यायाम होत नाही. 'मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' एवढा हसवतो की त्यामुळे फुप्फुसांना खूप व्यायाम होतो. हे चित्रपट पाहण्याचे आरोग्यदायी कारण आहे."

चित्रपटाच्या निर्मात्या मधुगंधा कुलकर्णी म्हणाल्या, "आनंदाची बाब म्हणजे प्रशांत दामले यांनी हिटलरचे काम करायला हो म्हटल्यामुळे चित्रपटाचे मूल्य वाढले आहे. चित्रपट आपोआपच मोठा झाला. त्यांनी अप्रतिम काम केले आहे. यात प्रशांत दामले यांच्याबरोबरच इतर कसलेले कलाकार चित्रपटात आहेत, त्यामुळे एक चांगली भट्टी जमून आली आहे. त्यांचे अभिनय उत्तम झाले आहेत. ही एक धमाल लाफ्टर राईड झाली आहे."

निर्माती कंपनी विवेक फिल्म्सचे भरत शितोळे या चित्रपटाबद्दल बोलताना म्हणाले, "आपल्या मातीतील ही कथा आहे आणि आपल्या मातीमध्ये येणारी आंतरराष्ट्रीय पात्रे व त्यांची होणारी भीड याची गम्मत आहे या चित्रपटामध्ये. हे नाटक आम्ही बघितले आहे. नाटक आणि चित्रपटात ह्युमर आणि फार्स समान आहे. चित्रपट इतका सुंदर आणि विनोदाच्या इतक्या वेगळ्या पातळीला जातो कि हसून हसून पुरेवाट होते."

## थोडक्यात



### उरुळी कांचन परिसर पहाटे काकड आरतीच्या सुरांनी भक्तीमय

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** नवरात्रीनंतर कोजागरी पौर्णिमेपासून ते दिवाळीनंतरच्या त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत महिनाभर उरुळी कांचन श्रीराम मंदिरातून काकडा आरतीचे सूर भल्या पहाटे कानी पडतात. वाढत्या शहरीकरणामुळे काळाच्या ओघात लुप्त होत चाललेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्यासाठी मोजकीच ज्येष्ठ मंडळी, महिला आणि छोटी मुले का होईना काकड्याला हजेरी लावून ही परंपरा पुढे चालवत आहेत. तरीही काकडा आरतीसाठी जमलेल्या विठ्ठल भक्तांनी मंदिराचा गाभारा भरून जातो. महिलांची संख्या लक्षणीय आहे. काकडा आरती मध्ये आंधळा, बहिरा, हरीची भजने, गौळणी म्हटल्या जातात. ज्येष्ठ महिलांचाही त्यात सहभाग असतो. तुपात भिजविलेल्या वातीची अर्थात काकड्याची ज्योतीची आरती ओवाळली जाते. सर्व देवदेवतांच्या आरत्या संपन्न होतात. पहाटे 4 वाजता सुरवात होऊन सकाळी 7 वाजता समाप्ती होते. उरुळी कांचन शहरातील काकडा आरतीची परंपरा कायम राखून आहेत. झपाट्याने शहरीकरण झालेल्या उरुळी कांचन मध्ये श्रीराम मंदिर मंदिरात मोठ्या उत्साहात काकड आरती संपन्न होताना दिसत आहे. उरुळी कांचन मधील समस्त ग्रामस्थ, श्री देवस्थान संस्था, श्रीराम जन्मोत्सव समिती, श्रीराम बचत गट आदीचे विशेष सहकार्य असते. पूर्व भागात सोरतापवाडी, शिंदवणे, कोरेगावमुळ, अष्टापुर, बिवरी, भवरापूर, वळती, पेठ, नायगाव, तरडे, हिंगणगाव याठिकाणी पहाटे वातावरण भक्तीमय होऊन जात आहे.

# खेड-आळंदी : १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील खेड-आळंदी विधानसभा मतदासंघातील 22 उमेदवारांपैकी 9 उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र मागे घेतले. 13 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.

खेड -आळंदी विधानसभा मतदार संघात एकूण 22 व्यक्तींनी नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले होते. सोमवारी (दि. 4) अर्ज माघारीच्या दिवशी 22 पैकी 9 उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतले. नामनिर्देशनपत्र मागे घेतल्येला उमेदवारांपैकी सुरेखा दत्तात्रय मोहिते (अपक्ष), मयूर दिलीप होले (अपक्ष), अरविंद बाळासाहेब पानमंद(अपक्ष), अक्षय ज्ञानेश्वर जाधव (महाराष्ट्र स्वराज्य पक्ष), सुधीर विठ्ठल मुंगसे (अपक्ष), अतुल महादेव देशमुख(अपक्ष), अमोल




बाजीराव दौंडकर(अपक्ष),अंकुश सुदाम राक्षे(अपक्ष), मनोहर महादू वाडेकर (अपक्ष), या 9 उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. खेड आळंदी विधानसभा निवडणूक रिंगणात अनिकेत मुरलीधर गोरे( बहुजन समाज पार्टी हत्ती )), दिलीप दत्तात्रय मोहिते पाटील( राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, घड्याळ), बाबाजी रामचंद्र काळे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, मशाल), रवींद्र राहुल रणदिवे (वंचित बहुजन आघाडी, गॅस सिलेंडर), अमर मच्छिंद्र बो-हाडे (अपक्ष, ट्रम्पेट), भूदेव कान्हू शिंदे (अपक्ष, हिरा), निळोबा चांगदेव गायकवाड (अपक्ष,गॅस शेगडी), प्रकाश जिजाबा काळे (अपक्ष, दूरदर्शन), किसन सखाराम गोपाळे (अपक्ष, शिट्टी ), साहेबराव नारायण जाधव (अपक्ष, दुर्बीण), सागर गंगाराम बनसोडे (अपक्ष, ॲटोरिक्षा ), सुनील विठ्ठल पवार (अपक्ष, कॅमेरा), अमित सुमंतराव गडदे (अपक्ष, एअर कंडिशनर ) हे 13 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

खेड -आळंदी विधानसभा मतदार संघात एकूण 3 लाख 76 हजार 623 मतदार असून त्यापैकी 1 लाख 93 हजार 719 पुरुष, 1लाख 82 हजार 892 व इतर 12 असे उमेदवार आहेत. सैनिक मतदार 306 आहेत. 389 मतदान केंद्र आहेत. रेंज न येणारी 6 मतदान केंद्रे आहेत. मतदार संघात संवेदनशील केंद्र तालुक्यात एकही नाही. होम व्होटिंग 120 अर्ज आले आहेत 85 पेक्षा जास्त वयाचे 85 मतदार असून 45 दिव्यांग मतदार आहेत. त्यांच्या घरी जाऊन अधिकारी मतदान करून घेणार आहेत. खेड आळंदी विधासनभा मतदार संघात मतदान व मतमोजणीसाठी 2278 कर्मचारी अधिकारी काम करणार आहेत. खर्च मर्यादा 40 लाख असून त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष ठेवून आहेत. सीव्ही जिल ॲप मतदारांनी मोबाईलवर डाउनलोड करून घेऊन त्याद्वारे आचारसहिंता भंग तक्रार केल्यास तात्काळ कारवाई केली जाईल. खर्चाची तपासणी तीन टप्प्यात होणार आहे दिनांक 11,13,18नोव्हेंबर रोजी खेड तहसीलदार कार्यालियात सकाळी 10ते 5या वेळेत होणार आहे.

> अतुल देशमुख यांच्या माघारीच्या वेळी. शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, प्रकाश म्हस्के,अंकुश काकडे, खेड तालुका अध्यक्ष हिरामण सातकर,आदी उपस्थित होते. अतुल देशमुख यांच्या माघारीच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण होते. यावेळी अतुल देशमुख यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते.

दरम्यान खेड आळंदी विधानसभा निवडणूक दुरंगी होणार असल्याचे चित्र माघारी नंतर स्पष्ट झाले आहे. अपक्ष उमेदवार अतुल देशमुख आणि महाराष्ट्र सुराज्य पक्षाचे अक्षय जाधव यांनी माघार घेतल्याने घड्याळ विरुद्ध मशाल असा सामना होणार आहे. अतुल देशमुख यांची माघारी चर्चेचा विषय झाला आहे.

अतुल देशमुख यांनी माघारी नंतर सांगितले, पक्षाचे नेते शरद पवार यांनी पुढील भवितव्यासाठी काही सूचना मार्गदर्शन केल्याने त्यांच्या सांगण्यावरून मी उमेदवारी अर्ज निवडणुकीत मागे घेतला आहे. तालुक्यातील काही पुढाऱ्यांनी तिकिटावरून चिवडा केला. हेतुपुरस्कर मला त्रास देण्याचे काम केले. पक्षाने मला एबी फॉर्म दिला नव्हता, जागा शिवसेनेला गेली. यामध्ये मोठे अर्थकारण झाले. मला बदनाम करण्याचे काम केले. मतदार संघात माझी सर्व तयारी झाली होती. वर्षभरापासून निवडणुकीची तयारी केली होती. मी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने कार्यकर्ते ढसाढसा रडत होते. मी हा निर्णय केवळ शरद पवार यांच्या स्वाभिमानी लढ्यात सहभागी होण्यासाठी घेतला आहे. एकाच जागेवर बंडखोरी होत असल्याने शिवसेनेच्या उमेदवाराला अडचण येणार होती.



## शेखर निकम यांना दीडपट मताधिक्य मिळेल - ना. उदय सामंत

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

तुम्ही केलेली विकास कामे व शिवसेना उपनेते माजी आमदार सदानंद चव्हाण यांची साथ यामुळे मागील निवडणुकीपेक्षा यावेळी दीडपट जास्त मताधिक्य असेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी महायुतीचे उमेदवार आमदार शेखर निकम यांच्या प्रचारार्थ आयोजित पोफळी येथील सभेत व्यक्त केला.

या सभेच्या माध्यमातून पोफळी जिल्हा परिषद गटात निवडणुकीचे रणशिंग फुंकण्यात आले. यावेळी व्यासपीठावर महायुतीचे उमेदवार आमदार शेखर निकम यांच्यासह माजी आमदार सदानंद चव्हाण, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी सभापती शौकत मुकादम, प्रदेश सरचिटणीस जयंद्रथ खताते, ज्येष्ठ नेते जिल्हा नियोजन मंडळ सदस्य दादा साळवी, माजी पंचायत समिती सदस्य बाबू साळवी, चिपळूण तालुकाध्यक्ष नितीन ठसाळे, भाजप चिपळूण तालुकाध्यक्ष वसंत ताम्हणकर, आरपीआय (आठवले गटाचे) प्रदेश संघटक संदेश मोहिते, प्रदेश उपाध्यक्ष सचिन मोहिते, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ. दिशा दाभोळकर, भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सौ. चित्रा चव्हाण, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सुरेखा खेराडे, भाजप चिपळूण तालुकाध्यक्ष वसंत ताम्हणकर, माजी उपसभापती सूर्यकांत खेतले, शिरगाव सोसायटी चेअरमन जयंतराव शिंदे, कोंडफनसवणे माजी सरपंच मधुकर इंदुलकर, ज्येष्ठ नेते किसन पवार, डॉ. शिवाजी मानकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडी तालुकाध्यक्षा सौ. जागृती शिंदे, शिवसेना युवासेना तालुका अधिकारी निहार कोवळे, शिरगावचे माजी सरपंच अनिल शिंदे, पोफळी सरपंच उस्मान सय्यद, माजी उपसरपंच अब्दुला सय्यद, पोफळी ग्रामपंचायत सदस्य संजय बामणे, कुंभार्ली सरपंच रवींद्र सकपाळ, मुंडे सरपंच मयूर खेतले, पोफळी ग्रामपंचायत माजी सदस्य रवींद्र पंडव, सुरेश घाणेकर, इब्राहिम सय्यद आदी उपस्थित होते.

यावेळी ना. उदय सामंत पुढे म्हणाले की, महायुतीचे उमेदवार शेखर निकम यांनी गेल्या वर्षात ज्या पद्धतीने चिपळूण- संगमेश्वरवासीयांची सेवा केली आहे. ते पाहता मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीचे कुटुंब मानून काम केलं आहे. तुम्ही केलेली कामे पाहता विजय तुमचा निश्चित आहे.

## राजस्थान रॉयल्स अकादमीची विजयी सलामी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजस्थान रॉयल्स अकादमी संघाने सोलापूर स्टार इलेव्हन संघाला पराभूत करताना इकोल स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इकोल टी-20 करंडक क्रिकेट स्पर्धेत विजयी सलामी दिली. शिंदे हायस्कूल मैदानावर झालेल्या पहिल्या लढतीमध्ये राजस्थान रॉयल्स संघाने सोलापूर स्टार संघाला 3 गडी राखून पराभूत केले. सोलापूर स्टार 11 संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित 20 षटकांत सर्वबाद 112 धावा केल्या. वैष्णव जावळेने धडाकेबाज 51 धावांची खेळी केली. त्याला निरंजन कदमने 12, आदर्श मानुरेने 11 तर सुधन्वा मानूरने 9 धावा करताना सुरेख साथ दिली. राजस्थान रॉयल्स अकादमीकडून केदार बजाजने 3, रवींद्र जाधवने 2 तर प्रथमेश गावडे व निलय नेवासकर यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला.

राजस्थान रॉयल्स संघाने 17.2 षटकांत 7 बाद 114 धावा करताना विजय साकारला.

## उरुळी कांचन येथे 'स्वराज्याचे आरमार' प्रदर्शन

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

छत्रपती शिवरायांनी आरमारात छोट्या जहाजांवर जास्त भर देत मचवा, शिबाड, पाल, गुराब, गलबत, पाटीमार इ. प्रकारची जहाजे बनवून घेतली होती त्या सर्वांच्या प्रतिकृती तसेच चोल साम्राज्याच्या जहाजांच्या प्रतिकृती. इंग्रज व पोर्तुगीजांचे जहाज आणि आय.एन.एस विक्रांत यांच्या प्रतिकृती व त्यांचा इतिहास या प्रदर्शनात दाखवला आहे. भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराजांनी जे आरमार उभारले होते. शिवरायांनी कल्याण, भिवंडी येथे जहाज उभारणीचे कार्य 24 ऑक्टोबर 1657 ला सुरू केले. सुरवातीला पोर्तुगीजांना त्यांनी या कामासाठी पगारी ठेवले होते. पण ते फार दिवस टिकले नाहीत तेंव्हा कोकणातील स्थानिक लोकांच्या मदतीने शिवरायांनी जहाज बांधणीचे काम पूर्ण केले अशी माहिती इतिहास अभ्यासक



महेश पवार यांनी दिली. आयोजक- पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई गड-किल्ले स्पर्धा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, उरुळी कांचन याठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. तरी प्रदर्शन जास्तीत जास्त नागरिकांनी पाहावे असे आवाहन प्रदर्शनचे आयोजक यांनी केले. प्रदर्शन वेळ : 3 नोव्हेंबर 2024 ते 4 नोव्हेंबर 2024 रोजी स. 10 ते रा. 9 वाजेपर्यंत. प्रदर्शन स्थळ : निर्माण स्पोर्ट्स ॲकेडमी, पी. एम. टी. बस स्टॉप पाठीमागे, उरुळी कांचन पुणे. यावेळी प्रदर्शनचे उदघाटन खंबेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव विकास जगताप, डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेचे संचालक संजय टिळेकर, उरुळी कांचन पतसंस्थेचे संचालक शिवाजी कांचन, सामाजिक कार्यकर्ते नारायण कांचन, स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष सुरेश सातव, पोलिस पाटील विजय टिळेकर, माजी उपसरपंच युवराज कांचन, माजी उपसरपंच सुनिल गोते, अनिरुद्ध पवार, संदिप कांचन, सचिन कांचन, गुरुदत्त सेवा विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तुपे, इतिहास अभ्यासक खलिल शेख, दत्तात्रय जवळकर, रॉयल मिडीया न्युजचे संस्थापक अध्यक्ष तुकाराम गोडसे, निर्माण डेव्हलपर्स सर्वेसर्वा निखिल भैय्या कांचन, सचिन काळे, राजु कापरे, सारिक सय्यद, आदीच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिरुद्ध पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप कांचन यांनी केले तर आभार सुनिल तुपे यांनी केले.

## सेवाव्रती कार्यकर्त्यांना सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न सरदार वल्लभाई पटेल कायदे पंडित होते, त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्रासाठी व सत्कर्म करण्यासाठी निरंतर केला. त्यांनी 565 संस्थानिकांना एकत्र आणून भारत एकसंध ठेवण्याची महान किमया केली ते केवळ आपल्या आपल्या उसदी राजकीय बुद्धिमत्तेद्वारे व आपल्या ज्ञानाद्वारे ते महान ज्ञान योगी होतें. त्याचप्रमाणे त्यांनी राष्ट्रासाठी आपला देह झिजविला व रात्रंदिवस सत्कर्म करून स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये भाग घेतला, सत्याग्रहामध्ये भाग घेतला, विविध चळवळी केल्यात, अनेक पूरग्रस्तांना, प्ले गग्रस्तांना, शेतकऱ्यांना शेतमजुरांना, वंचितांना व समाजातील गरीब घटकांसाठी रात्रंदिवस ते लढले , झगडले आणि त्यांना विविध मूलभूत



गरजा भागवण्यासाठी परिश्रम घेतले. सरदार थोर स्वातंत्र्य सेनानी तर होतेच पण महान कर्मयोगी सुद्धा होते . त्याचप्रमाणे स्वातंत्र्यासाठी लढताना त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला परंतु त्यांनी आपला सत्वगुण सोडला नाही, भक्ति हा गुण सोडला नाही, तुरुंग मध्ये असताना त्यांनी भगवद्गीता व रामायण ते नेहमी वाचत असत. नवविधा भक्तीतील वाचन भक्ती हा योग त्यांनी साधला. सरदार वल्लभ भाई पटेल हे ज्ञानयोग , कर्मयोग भक्तीयोग, साधणारे एक महान तपस्वी होते. ते जन्मभर गीतेतील अध्याय दुसऱ्या मधील ओवि 47 नुसार निष्काम कर्मयोग जगले. असे महान निष्काम कर्मयोग सरदार वल्लभाई पटेल निष्काम कर्मयोगी होते . निष्काम कर्मयोगी सरदार वल्लभभाई पटेल हे महान विभूती होते . वल्लभभाई पटेल यांची

> कार्यक्रमात समर्पित भावनेने विविध क्षेत्रात निरपेक्षपणे, निरंतर राष्ट्रसेवा करणाऱ्या विविध क्षेत्रातील सेवाव्रती कार्यकर्त्यांना सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार प्रधान समारंभ झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांचे शुभ हस्ते भारतरत्न सरदार वल्लभाई पटेल हिंदू रत्न राष्ट्रीय पुरस्कारामध्ये सुशील कुमार सरावगी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय विचार मंच दिल्ली, राहुल कुमार गोयल केंद्रीय महामंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय विचार मंच दिल्ली यांना राष्ट्रीय सरदार वल्लभभाई पटेल हिन्दू रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जयंती साजरी करणे म्हणजे विभूती पूजा आहे असे मत जेष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले.

डॉ मणी भाई मानव सेवा ट्रस्ट निती आयोग संलग्नित भारत सरकार संस्थेच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल जयंती, व राष्ट्रीय एकात्मता दिन, तसेच सरदार पटेल यांच्या जीवनावर आधारित मार्गदर्शन राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राज्यस्तरीय व राष्ट्रीय मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर रवींद्र भोळे यांनी वरील मत व्यक्त केले. आपल्या भाषणात डॉक्टर रवींद्र भोळे पुढे म्हणाले की सरदार वल्लभभाई पटेल यांनी हिंदुत्वाची ज्योत पेटवली, हिंदुत्वाचे ऊर्जा स्तोत्र, व अखंड भारत राष्ट्राचे शिल्पकार हिंदू राष्ट्राचे शिल्पकार म्हणजे सरदार वल्लभाई पटेल असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ते पुढे म्हणाले की सरदार वल्लभभाई पटेल यांना डायाभाई व मनीबेन अशी दोन अपत्ये असताना त्यांनी सत्ता संपत्तीचा मोह धरला नाही. असे हे जागतिक पातळीवरचे महान नेतृत्व आपल्या देशामध्ये होऊन गेले याचा प्रत्येकाला सार्थ अभिमान असावा.

कार्यक्रमासाठी व्यासपीठावर सिताराम राणे, डॉ. सुनील पाटील वैद्यकीय अधीक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे, अमोल पाटील, डॉ हेमंत झोपे विजय खर्चे, त्रिवंदा पुरोहित हभप मधुकर जाधव, हभप दिलीप शंकर पाटील, ज्येष्ठ पत्रकार प्रल्हाद जी खर्चे पत्रकार व ज्योतिष, पत्रकार प्रतिक गंगणे, दिनकर चौधरी, सुभाष कट्यारमल, पत्रकार अमोल भोसले, शिवाजीराव कांचन, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# डेलॉइट इंडियाने एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स 2024 साठी कंपन्यांना केले आमंत्रित

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

डेलॉइट इंडियाने एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स 2024 (ईजीए 2024) ची पहिली आवृत्ती लॉन्च केली आहे, जो उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम भारतातील विशिष्ट कौटुंबिक मालकीचे व्यवसाय, युनिकॉर्न आणि सूनीकॉर्न यांचे योगदान ओळखण्याचा एक उपक्रम आहे. सहभागी होण्यासाठी सुरू झालेले हे प्रादेशिक पुरस्कार, उत्कृष्ट नेतृत्व, दूरदृष्टी आणि विकास दर्शविणाऱ्या आणि त्यांच्या स्थानिक समुदायांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करतील. पुरस्कार प्रक्रिया आर्थिक कामगिरी, नवकल्पना आणि सामाजिक प्रभाव यासारख्या प्रमुख निकषांवर आधारित कंपन्यांचे बारकाईने मूल्यांकन करेल. कौटुंबिक व्यवसायांना सहभागी होण्यासाठी एक निकष असा आहे की त्यांची विक्री उलाढाल 1,000 कोटी ते 5,000 कोटी रुपयांच्या दरम्यान असावी आणि प्रमोटरची मालकी लक्षणीय (26 टक्क्यांहून अधिक) असावी. 500 मिलियन अमेरिकी डॉलर ते 1 बिलियन अमेरिकी डॉलर दरम्यान मूल्यमापन असलेल्या स्टार्ट-अप्स कंपन्यांना देखील अर्ज करण्यासाठी आमंत्रित केले आहे. हा पुरस्कार प्रत्येक कंपनीच्या गेल्या तीन वर्षांतील आर्थिक नोंदींचा आढावा घेऊन त्यांच्या विकासाचा प्रवास आणि त्यांच्या समुदायातील योगदानाचे मूल्यांकन करतील. के.आर. सेकर, पार्टनर आणि लीडर - डेलॉइट प्रायव्हेट, डेलॉइट इंडिया म्हणाले, "कौटुंबिक मालकीचे व्यवसाय, उदयोन्मुख विकसित कंपन्या, भारतातील विविध क्षेत्रांतील युनिकॉर्न आणि सूनिकॉर्न हे आपल्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत, तरीही अनेकदा ते कमी ओळखले जातात. या कंपन्या प्रादेशिक विकास आणि राष्ट्रीय प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात आणि रोजगार निर्मिती, नवकल्पना आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. ईजीए लाँच करून, उद्योगातील या अनेकदा दुर्लक्षित केलेल्या कंपन्यांना समोर आणण्याचे, त्यांना योग्य ती ओळख देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या यशाचा आनंद साजरा करून, आम्हाला संपूर्ण भारतभर उच्च- विकास करणाऱ्या कंपन्यांचे गतिशील नेटवर्क वाढवायचे आहे, आणि सतत प्रगतीसाठी आणि भारताच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला पाठिंबा देण्यासाठी सहयोग आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन देतो. आम्ही सर्व पात्र कंपन्यांना सहभागी होण्यासाठी आणि हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोत्साहित करतो." धीरज भंडारी, पार्टनर, डेलॉइट इंडिया म्हणाले "ईजीएच्या माध्यमातून, आम्ही केवळ व्यावसायिक यशावर प्रकाश टाकण्यापेक्षा बरेच काही करण्याचे ध्येय ठेवतो. आम्हाला या कंपन्यांचे समर्पण, लवचिकता आणि दीर्घकालीन वचनबद्धता ओळखायची आहे.

जसजसे कौटुंबिक मालकीचे व्यवसाय, युनिकॉर्न आणि सूनिकॉर्न वाढतात, तसतसे त्यांना अनन्य आव्हानांना सामोरे जावे लागते आणि त्यांच्या समुदायासाठी अर्थपूर्ण योगदान देत असताना या आव्हानांवर मात करण्याची त्यांची क्षमता, त्यांची मूल्ये आणि दृष्टीकोनातून स्पष्ट होते. हा उपक्रम त्यांच्या कार्यक्षमतेची तसेच त्यांच्या जिद्दीची ओळख करून देणारा आहे. मला आशा आहे की हे पुरस्कार कंपन्यांना त्यांचा प्रवास शेअर करण्यासाठी, इतरांना प्रेरणा देण्यासाठी आणि शेवटी सतत आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाच्या व्यापक उद्दिष्टासाठी योगदान देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतील".

हा पुरस्कार प्रत्येक प्रादेशिक पुरस्कार समारंभात व्यवसायांना त्यांच्या सहकाऱ्यांसोबत संपर्क साधण्याची आणि उद्योगातील अग्रगण्य कंपन्यांशी कनेक्ट होण्याची संधी देईल. एंटरप्राइझ ग्रोथ अवॉर्ड्स विजेते डेलॉइटच्या बेस्ट मॅनेज्ड कंपनीज प्रोग्राममध्ये देखील सहभागी होऊ शकतील, जो जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त प्रमुख पुरस्कार कार्यक्रम आहे.

# पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धा ६ ते ९ नोव्हेंबर दरम्यान रंगणार

## ओमप्रकाश चौहान, उदयन माने, वीर अहलावत, रशीद खान व करणदिप कोचर या अव्वल खेळाडूंचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

द पूना क्लब गोल्फ कोर्स आणि भारतातील व्यावसायिक गोल्फचे एकमेव अधिकृत नियामक मंडळ टाटा स्टिल प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने 6 ते 9 नोव्हेंबर दरम्यान पूना क्लब गोल्फ कोर्स येथे रंगणाऱ्या द पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धेची आज घोषणा करण्यात आली. या स्पर्धेमध्ये पुण्यातील आतापर्यंतच्या सर्वोच्च 1 कोटी रुपये पारितोषिक रकमेचा समावेश आहे.

या स्पर्धेला यजमान पूना क्लब गोल्फ कोर्स, मुख्य प्रायोजक वेंकीज इंडिया लिमिटेड, व्हेनकॉब आणि एनईईसीसी यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच, विप्रो पारी, पंचशील, शूबान इनव्हेस्टमेंट्स, एलिका आणि ऑटोमेक हे या स्पर्धेचे सहयोगी प्रायोजक आहेत.

पत्रकार परिषदेत पूना क्लब लिमिटेडचे अध्यक्ष गौरव गढोक, उपाध्यक्ष इंद्रनील मुजगुले, पूना क्लब गोल्फ कोर्सचे कॅप्टन जय शिर्के, लेडी कॅप्टन पद्मजा शिर्के, माजी कॅप्टन व गोल्फ सल्लागार इक्रम खान,



पीजीटीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम सिंग मुंडी, पुण्याचा ऑलिंपिकपटू उदयन माने, 2024 वर्षासाठी टाटा स्टिल पीजीटीआय अग्रमानांकित वीर अहलावत,पीजीटीआयच्या विपणन व टूर डेव्हलपमेंट विभागाचे संचालक विकास सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा स्पर्धेत अग्रगण्य भारतीय खेळाडूंचा समावेश असून त्यात डीपी वर्ल्ड टूर मधील नियमित सहभागी खेळाडू ओमप्रकाश चौहान, पुण्याचा ऑलिंपिकपटू उदयन माने, 2024 वर्षासाठी टाटा स्टिल पीजीटीआय अग्रमानांकित वीर अहलावत, रशीद खान, करणदीप कोचर, शौर्य बिनु, सचिन बैसोया, वरुण पारीख, धृव शेवराम व शौर्य भट्टाचार्य या खेळाडूंचा सहभाग हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

या स्पर्धेत चेक प्रजासत्ताकचा स्टेपॅन दानेक, बांग्लादेशचे जमाल हुसेन, बादल हुसेन, मोहम्मद अकबर हुसेन व मोहंमद झाकीरु जमान झाकीर, श्रीलंकेचा एन थंगराजा व एनडोराचा केविन इस्टिव्ह रिगेल, नेपाळचा सुभाष तमंग, कॅनडाचा सुखराजसिंग गिल, जपानचा माकोटो इव्हासाकी आणि अमेरिकेचे डॉमिनिक पीसीरीलो व दिगराज सिंग गिल या परदेशी खेळाडूंचे आव्हान राहणार आहे.

यजमान पूना क्लब गोल्फ कोर्सचे प्रतिनिधित्व व्यावसायिक खेळाडू रोहन ढोले पाटील, प्रणव मार्डीकर, अक्षय दामले, प्रवीण पठारे, एरोन रॉकी, गुर्की शेरगिल (माजी पीजीटीआय विजेता), आदित्य भांडारकर, समीर शेख, राजीव दातार, संदीप फळणीकर व जयदीप पटवर्धन करणार असून आरकिन पाटील, आदित्य गर्ग, अवनिश सोमय्याजी या हौशी खेळाडूंचा देखील समावेश आहे. ही स्पर्धा एकुण 72 होल स्ट्रोक प्ले प्रकारची असून त्यामध्ये 123 व्यावसायिक व 3 हौशी अशा एकुण 126 खेळाडूंचा सहभाग निश्चित झाला आहे. पहिल्या 36 होल्स नंतर अव्वल ठरलेले पहिले 50 खेळाडू त्यानंतरच्या 36 होल्सच्या स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

**माजी कॅप्टन व गोल्फ सल्लागार इक्रम खान म्हणाले की या स्पर्धेचे आयोजन ही पूना क्लब गोल्फ कोर्ससाठी ऐतिहासिक घटना असून क्लबचे अध्यक्ष गौरव गढोक यांच्या अथक परिश्रमाचेच ते फळ आहे. पूना क्लबच्या सदस्यांसाठी ही स्पर्धा म्हणजे प्रोॲम व गोल्फ क्लिनिक पर्यंत मजल मारलेल्या अव्वल भारतीय खेळाडूंशी संवाद साधण्याची एक मोलाची संधी ठरणार आहे. ही स्पर्धा यापुढील काळात पूना क्लब गोल्फ कोर्स येथे नियमितपणे आयोजित केली जाईल, असा आमचा प्रयत्न राहील. पीजीटीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम सिंग मुंडी म्हणाले की, ही अत्यंत प्रतिष्ठेची स्पर्धा पूना क्लब गोल्फ कोर्स येथे आयोजित करण्यासाठी आणि या स्पर्धेसाठी आवश्यक ते प्रायोजक व निधी उभा करण्यात यशस्वी ठरल्याबद्दल मी क्लबचे अध्यक्ष गौरव गढोक , कॅप्टन जय शिर्के, माजी कॅप्टन इक्रम खान व पूना क्लबच्या सर्व संयोजन समिती सदस्यांचे आभार मानतो. पुणे हे आता देशातील प्रमुख गोल्फ स्पर्धांचे महत्त्वाचे केंद्र बनले असून त्यामुळे या ठिकाणी गुणवान व्यावसायिक गोल्फपटू नियमितपणे तयार होत आहेत. त्यामुळेच पूना क्लब गोल्फ कोर्सच्या सहकार्याने ही स्पर्धा आगामी काळात नियमितपणे आयोजित करून पीजीटीआयसाठी तो महत्वाचा टप्पा बनेल, असाच आमचा प्रयत्न राहणार आहे.**

पूना क्लब लिमिटेडचे अध्यक्ष गौरव गढोक यांनी पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धेत भारतातील सर्वोत्कृष्ट व्यावसायिक खेळाडूंच्या सहभागाबद्दल आनंद व्यक्त करताना स्पर्धेचे महत्व अधोरेखित केले. या स्पर्धेमुळे पूना क्लबच्या सदस्यांना उच्च दर्जाच्या स्पर्धेबरोबरच व्यावसायिक दर्जाचे कौशल्य पाहण्याची संधी उपलब्ध झाली असून हौशी व कुमार गटातील खेळाडूंना व्यावसायिक खेळाडूंशी स्पर्धा करण्याचीही सुवर्ण संधी यामुळे मिळणार असल्याचे सांगितले.

गढोक पुढे म्हणाले की, या स्पर्धेमुळे पूना क्लब गोल्फ कोर्स हे देशातील सर्वोच्च दर्जाची स्पर्धा आयोजित करण्यासाठीचे योग्य ठिकाण असल्याचे सिद्ध झाले असून सर्व सहभागी खेळाडूंना मी शुभेच्छा देतो.

द पूना क्लब लि. चे उपाध्यक्ष इंद्रनील मुजगुले म्हणाले की पूना क्लब ओपन गोल्फच्या पहिल्या आवृत्तीमध्ये आम्ही भारत आणि परदेशातून सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे स्वागत करतो . हा आठवडा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरेल अशी आशा आम्ही करतो . दोन वर्षानंतर पूना क्लब गोल्फ कोर्स येथे पीजीटीआय स्पर्धा होत असून यासाठी समर्थन दिल्याबद्दल मुख्य प्रायोजक आणि सहयोगी प्रायोजक यांचे आम्ही आभार मानतो.

पूना क्लब गोल्फ कोर्सचे कॅप्टन जय शिर्के म्हणाले की, पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धेचे पहिले सत्र आयोजित करण्याची संधी मिळाल्यामुळे आम्ही अत्यंत आनंदी असून पुण्यासारख्या ठिकाणी इतक्या उच्च दर्जाची स्पर्धा होत असल्यामुळे येथील कुमार व हौशी गोल्फ पटूना मोठीच प्रेरणा मिळणार आहे. आम्ही या स्पर्धेसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या असून पूना क्लब गोल्फ कोर्सवर खेळण्याचा रोमांचकारी अनुभव सहभागी खेळाडूंना निश्चितच आनंद देऊन जाईल. पूना क्लब गोल्फ कोर्सच्या लेडी कॅप्टन पद्मजा शिर्के म्हणाल्या की, पूना क्लबने गेल्या काही वर्षात अनेक गुणवान महिला व्यावसायिक व हौशी खेळाडू निर्माण केले असून त्या राष्ट्रीय स्तरापर्यंत उत्तम कामगिरी बजावत आहेत. या स्पर्धेमुळे भारतातील सर्वोत्तम व्यावसायिक पुरुष खेळाडूंशी संवाद साधण्याची व त्यायोगे आपला दर्जा उंचावण्याची संधी येथील महिला खेळाडूंना लाभणार आहे.

**द पूना क्लब गोल्फ कोर्स हे या स्पर्धेसाठीचे मुख्य केंद्र व ठिकाण असून १०० एकरांहून अधिक विस्तृत परिसरात पसरलेल्या या कोर्सवर विशाल वट वृक्ष आणि अनेक वृक्षांचा प्रामुख्याने समावेश आहे. हा गोल्फ कोर्स येथील हिरवळीसाठी प्रसिद्ध आहे. या कोर्सवर गेल्या काही वर्षात अनेक राष्ट्रीय व कुमार गटाच्या स्पर्धा पार पडल्या आहेत. या आव्हानात्मक गोल्फ कोर्सवरील चौथ्या होल मध्ये 'होल इन वन' (एकाच शॉट मध्ये लक्ष्य साधणे) जो खेळाडू सर्व प्रथम साध्य करेल अशा खेळाडूला निसान मॅग्नेट कार हे खास पारितोषिक देण्यात येणार आहे.**




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.